# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/१०/२०१८
## दि.१४/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३७७/१८,भादविक ३९२,३५४,३४१,५०६(१),३४ व पोस्को ॲक्ट ८ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३८,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०१८ रोजी दु.१२/०० वा. वुडलॅन्ड शो-रुम जवळ सातारा रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी,वय-१७ वर्षे हि सदर ठिकाणाहुन तीचे डेव्हलेपमेंट कोर्सचे क्लासला जात असताना,यातील नमुद इसमांनी संगनमत करुन,तीस अडवुन जवळ ओढण्याचा प्रयत्न करून,हाताने मारहाण करुन,तीचे जवळील ७,५००/- रु किंचा मोबाईल व हॅन्डसेट कव्हर मध्ये ठेवलेले ५,०००/- रुपये रोख असा ऐवज जबरदस्तीने काढुन घेवुन जात असताना,सदर मुलीचे ओळखीचा साथीदार हा तीचे मदतीस आला असता,त्यासही सदर इसमांनी हाताने मारहाण करून,फिर्यादी यांचे कुटुंबास जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शंकर सलगर ८८८८८०६११८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५१५/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४६,रा.सनसिटी रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०१८ रोजी २०/३० ते २०/४५ वा.चे दरम्यान नगर अर्बन बँके समोरून पुढे सनसिटी रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र २५ हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गिरीश सोनवणे ९८२२२८५८४८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४०७/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | इक्बाल लखानी,वय-४० वर्षे,रा.श्रीराम चौक,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१०/२०१८ रोजी २०/३० ते दि.१३/१०/२०१८ रोजी २१/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.१४ बिल्डींग नं.ए.१६,गंगा व्हीलेज सोसायटी,हांडेवाडी रोड हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील हुसेन लखानी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे वडीलांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख ६० हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण २,१०,०००/- किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) भापकर ९०११०५२००५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६५३/१८,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२६,३२३,५०४,५०६(१) |
| **फिर्यादी** | अजिक्य अनिलकुमार कदम,वय-२३,रा.महमदवाडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/१०/२०१८ रोजी १९/०० वा. स्पाईस वर्ल्ड हॉटेल समोर महमदवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा भाऊ अभिजीत कदम व मित्र सिध्दांत जाधव यांचेसह स्पाईस वर्ल्ड हॉटेल समोर गप्पा मारीत बसले असताना,तेथे एक श्वानाचे पिल्लु रोडचे कडेला बसले हाते. त्यावेळी यातील नमुद इसमांपैकी दोघांनी त्यांची दुचाकी श्वानाचे पिल्लावर घालण्याचा प्रयत्न केला असताना ते तेथुन उठुन पळुन गेले. त्याचा जाब सदर इसमांना फिर्यादी यांनी विचारल्याचे कारणावरून त्यांनी इतर इसमांना बोलावुन,फिर्यादी व त्यांचा भाऊ अभिजीत कदम तसेच मित्र सिध्दांत जाधव यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून,फिर्यादी यांचे कपाळावर ॲल्युमिनीयमचे पट्टीने मारून जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चेतन मोरे ९८७०३२७७०० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २१७/१८,भादविक १४३,१४७,१४९,३२४,३२३ |
| **फिर्यादी** | कमिन नसिब खान,वय-१९,रा.भाग्योदयनगर कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार ते पाच इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी ०१/४५ वा. सोलापुर बाजार चौका,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे एकमेकांचे ओळखीचे असुन,त्यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरुन गैर-कायदयाची मंडळी जमा करुन,फिर्यादीस हाताने व कोयत्याने पायाचे नडगीवर मारुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.टी.निंबाळकर ९४२३५६४२८९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११७१/१८,भादविक ३२६,३२४,४२७,५०६,१४२,१४३,१४७,१४८,१४९,क्रिमीनल लॉ ॲमेंन्डमेंड ॲक्ट कलम ३ प्रमाणे |
| **फिर्यादी** | जिवन कांबळे,वय-२९ वर्षे,रा.उत्तमनगर फुरसुंगी,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात ते आठ इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०१८ रोजी पहाटे ०१/०० वा.शैलेश सुतार यांचे घरासमोर मोकळ्या जागेत उत्तम नगर,फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासोबत गप्पा मारत थांबले असताना,त्यांचे भागात राहणारे इसमांना फिर्यादी यांनी वेळोवेळी चोऱ्या-माऱ्या व भांडणे करुन नका असे सांगत असल्याचा राग मनात धरुन,त्यांनी फिर्यादी यांचे दोन्ही हाताच्या पंज्याजवळ व पायावर कोयत्याने वार करुन त्यांना गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी यांना सोडविण्यास आलेल्या मित्रांना लाकडी दांडक्याने मारहाण करून,फिर्यादी यांचे कारची काच फोडुन त्याचे नुकसान केले आहे. सदर ठिकाणी दहशत निर्माण करून झालेल्या प्रकारामुळे तेथील नागरीकांनी सैरावैरा पळुन स्वतःचे घराचे दारे बंद केली आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. के.एस.लोंढे ८९७५०२०५०० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५१६/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एस.एस.दळवी,सहा.पो.फौज. दत्तवाडी वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | चारचाकी वाहनावरील अज्ञात चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०१८ रोजी १६/०० ते १८/०० वा.चे दरम्यान विश्वास हॉटेलचे गेट समोर सर्व्हिस रोडवर वडगांव-खुर्द,सिंहगड रोड,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दत्तवाडी वाहतुक विभाग,पुणे येथे वाहतुकीचे नियमन करून,त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना,यातील नमुद चारचाकी वाहनावरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे विश्वास हॉटेलचे गेट समोर सर्व्हिस रोडवर सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण होईल असे लावलेले असल्याने,सदर वाहनास फिर्यादी यांनी सरकारी जॅमर पिवळया रंगाचे गोल लोखंडी लावलेले असताना,वाहन चालकाने सदरचे सरकारी जॅमर हे वाहनासह चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.एस.भामरे ९५२७५७८०८९ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११७२/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | गोरक्षणाथ कोलते,वय-३१ वर्षे,रा.काळेपडळ,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/१०/२०१८ रोजी १४/०० वा. ते दि.०९/१०/२०१८ रोजी ११/३० वा.चे दरम्यान अपेक्षा मंगल कार्यालयाचे पाठीमागील फुरसुंगी आयडीया एटीसी टॉवरचे साईटवर |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी अपेक्षा मंगल कार्यालयाचे पाठीमागील फुरसुंगी आयडीया एटीसी टॉवरचे साईटवर असलेल्या आयडीया एटीसी टॉवरच्या काळ्या रंगाच्या अमर राजा कंपनीच्या एकुण २४ बॅटऱ्या १,२४,०००/- रुपये किंच्या कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून नेल्या आहेत. (फिर्यादी यांनी सदर बाबत तक्रारी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावरुन फिर्यादी हे समक्ष हजर झाल्यानंतर गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.पी.भांगे ८८०५३३३०३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**